# पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा

मल्हारपेठ सातारा ४१५००१ फोन नंबर (०२१६२)- २३४२३१

## प्रेस नोट

दि.२०/०९/२०२५

## २० वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२५ मध्ये ७ सुवर्ण, ४ रौप्य व १ कांस्य पदके पटकावून कोल्हापूर परिक्षेत्रीय संघाकडे सर्वसाधारण उपविजेतेपद.

दिनांक १४/०९/२०२५ ते दिनांक १९/०९/२०२५ या कालावधीत २० वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा- २०२५ पुणे येथे संपन्न झाला. या पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी केले होते.

महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या दैनंदिन कामकाजामध्ये त्यांचे व्यावसायीक कौशल्य वापरुन गुन्हे तपास, दैनंदिन कामकाज, फॉरेन्सीक कामकाज, घातपात विरोधी तपासणी, श्वानांचे कामकाज आदी कामकाजामध्ये अंमलदारांचे व्यवसायीक कौशल्य वापरुन कामकाजामध्ये गती व सुलभता कशा प्रकारे येईल या अनुषंगाने पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून दरवर्षी करण्यात येते. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातुन एकूण २६ संघांनी भाग घेतला होता. यामध्ये सर्व पोलीस आयुक्तालये, सर्व परिक्षेत्रे, सीआयडी, एमआयए, फोर्सवन, बिनतारी संदेश विभाग, रेल्वे, राज्य राखीव पोलीस बल, दहशतवाद विरोधी पथक आदी घटकांनी सहभाग घेतला होता.

२० व्या महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याचा सांगता समारंभ दिनांक १९/०९/२०२५ रोजी राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक २ या ठिकाणी पार पडला असून सदर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मा.श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई या उपस्थित राहील्या. तसेच राज्यातील विविध वरिष्ठ पोलीस अधिकारी देखील कार्यक्रमास उपस्थित होते. विजेत्या संघाना मा.श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या मेळाव्यामध्ये सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे ग्रामीण व सोलापूर ग्रामीण पाच जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांमूधन निवड करण्यात आलेल्या कोल्हापूर परिक्षेत्रीय संघातील सहभागी स्पर्धकांनी सायंटीफक एड टू इन्व्हेस्टीगेशन या स्पर्धा प्रकारामध्ये **श्री.अन्वर मुजावर, सपोनि (जिल्हा सातारा)** यांनी १ सुवर्ण पदक व १ रौप्य पदक, पोलीस फोटोग्राफी या क्रिडा प्रकारामध्ये **श्री.रघुनाथ शिंदे, (जिल्हा पुणे ग्रामीण)** यांनी १ सुवर्ण पदक, घातपात विरोधी तपासणी या क्रिडा प्रकारामध्ये **श्री.संदीप पांडव (जिल्हा सातारा)** यांनी १ सुवर्ण पदक, १ रौप्य पदक व **श्री.अमोल गवळी, (जिल्हा सातारा)** यांनी १ रौप्य पदक, काम्प्युटर अवेरनेस या क्रिडा प्रकारामध्ये **श्री.निखील जाधव (जिल्हा सातारा)** यांनी २ सुवर्ण पदके, **श्री. प्रसाद मांढरे (जिल्हा सोलापूर ग्रामीण)** यांनी १ सुवर्ण पदक व १ कांस्य पदक, **श्री.अजय सावंत (जिल्हा कोल्हापूर)** यांनी १ सुवर्ण पदक तर श्वान स्पर्धा या क्रिडा प्रकारामध्ये सातारा जिल्हा पोलीस दलाकडील **श्वान सूचक** यांसह श्वान हस्तक **श्री.दत्तात्रय चव्हाण व सचिन भोसले (जिल्हा सातारा)** यांना १ सुवर्ण पदक मिळविले आहे. अशा प्रकारे कोल्हापूर परिक्षेत्रीय संघाने एकूण ७ सुवर्ण पदके, ४ रौप्य पदके व १ कांस्य पदक **(१२ पदके)** पटकावून महाराष्ट्र राज्यामधून सहभागी झालेल्या २६ संघामधून सर्वसाधारण **सांघीक उपविजेतेपद** पटकावले आहे. यासह कॉम्पुटर अवेरनेस या स्पर्धा प्रकारामध्ये ३ सुवर्ण पदके, १ रौप्य पदक व १ कांस्य पदक मिळवून **कॉम्प्युटर अवेरनेस विनर ट्रॉफी** पटकावली आहे. त्याचबरोबर पोलीस फोटोग्राफी आणि व्हिडीओग्राफी या स्पर्धेमध्ये **फोटोग्राफी विनर ट्राफी** पटकावली आहे.

या सर्व कामगिरीसाठी **मा.श्री.सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर, मा.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, मा.श्रीमती डॉ.वैशाली कडूकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्री.अतुल सबनीस, पोलीस उप अधीक्षक (गृह) यांनी विशेष मार्गदर्शन केले.** तसेच आगमी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा- २०२५- याचे यजमान पद यावर्षी महाराष्ट्र राज्याकडे असून या स्पर्धा माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये नागपूर येथे आयोजीत केल्या आहेत. या स्पर्धेसाठी सहभागी होणाऱ्या पदक विजेत्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आहेत.


२० वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२५, पुणे
AI-generated content


कोल्हापूर परिक्षेत्र
समारोप समारंभ


कोल्हापूर परिक्षेत्र


MAHARASHTRA STATE POLICE DUTY MEET
SHRI A. M. KAMTHE TROPHY
CHAMPIONSHIP

